# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ/ तक्रार/४६६/२०२३/जळगाव

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.रोहिदास यादव खामकर,<br>रा.मु.पो.रवंजे खु., ता.एरंडोल, जि.जळगाव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,रवंजे खु.,<br>ता.एरंडोल, जि.जळगाव. |

सुनावणी दिनांक-१५/०७/२०२५

तक्रारदार यांनी दि.१७/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये, " मी.दि.२५/०८/२०१९ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन, नियमाप्रमाणे माहिती मागितली असता, ती मला देणेत आली नाही. त्यावर मी पहिले अपिल गटविकास अधिकारी, एरंडोल पंचायत समितीकडे यांचेकडे केले, मला त्यांचेकडेही न्याय मिळाला नाही. माझ्यावर आकस बुध्दीने वागत आहे. रवंजे ग्रा.पं.चे ग्रामसेवक, पदाधिकारी, हे माझे बी.पी.एल.यादी मधील माझे नाव मुद्दाम गहाळ केलेले आहे, याबाबतची माहिती काढणेसाठी मी अर्ज केला, पंरतु मला न्याय देत नाही. तरी त्यांचे विरुध्द कडक कायदेशीर कारवाई करणेत यावी व मला न्याय मिळावा. " असे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१५/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी — तक्रारदार अनुपस्थित असून विद्यमान आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२५/०८/२०१९ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

*" ग्रूप ग्रामपंचायत, रवंजे खु. येथील बि.पी.एल. धारकांच्या नावाची यादी मिळणेबाबत. १९८७-८८ ते १९९७-९८ नंतर आजतारखेपर्यंत ज्या याद्या कोणत्या याद्या कोणत्या तारखेला प्रसारित झाल्या असल्या त्या मला मिळाव्यात."*

४. सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, तक्रारदार यांचा दिनांक २५/०८/२०१९ चा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झाला नसल्याकारणाने तक्रारदार यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही.

५. सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांचा दिनांक २५/०८/२०१९ चा माहिती अर्ज संबंधित प्राधिकरणास सादर केल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केल्याचे दिसून येत नाही. तसेच, तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात प्रथम अपील अर्जाचा उल्लेख केलेला आहे मात्र सदरचा अर्ज तक्रार अर्जासोबत जोडल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे अर्ज संबंधित प्राधिकरणांस प्राप्त झाले नसल्याचे सिध्द होते. तसेच,प्रत्यक्ष सुनावणीवेळी तक्रारदार अनुपस्थित असल्याने त्यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काहीही सिध्द केले नसल्याने सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

आदेश

प्रस्तूत तक्रार **क्र.४६६/२०२३/जळगाव** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. २६८०९

0 2 APR 2026